# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## जाहिर आवाहन

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ मधील तरतुदीन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील काही इमारतीना "धोकादायक" घोषित करण्यात आलेले आहे. सदर इमारतीतील रहिवाशांना त्यांची निवासस्थाने रिक्त करण्याकरिता महापालिकेकडून वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तथापी, काही इमारतीमध्ये अजूनही नागरिक वास्तव्यास आहेत. धोकादायक इमारतीतील नागरीकांनी त्यांच्या इमारतीचा ताबा त्वरीत सोडून, सदर इमारत स्व:तहून निष्कासित करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवित व वित्तहानी झाल्यास त्याबाबतची जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणा-या संबंधीत नागरिकांची राहील, त्याकरिता महापालिका जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२. "धोकादायक/अतिधोकादायक" घोषित करण्यात आलेल्या इमारतीची प्रभाग समिती निहाय यादी उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.in या संकेतस्थळावर List of Dangerours Buildings या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. त्यामध्ये ११६ इमारती धोकादायक घोषित करण्यात आलेल्या आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने व कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी सदर इमारतींमधील रहिवाश्यांनी तात्काळ सदर इमारती ७ दिवसांच्या आत रिकाम्या कराव्यात. तसेच सदर इमारती मान्यताप्राप्त संरचनात्मक अभियंता (Duly Qualified Structural Engineer) यांचेमार्फत तपासणी करुन नियमानुसार इमारत दुरुस्त करुन, त्यानंतर इमारतीचे स्थैर्यता प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) महापालिकेत सादर करावे व त्यानंतरच रहिवासी वापर सुरु करावा.

**३. वास्तव्यास असणारी इमारत ढोबळमानाने धोकादायक झाली आहे, याबाबत काही प्राथमिक लक्षणे आढळून येतात, ती खालीलप्रमाणे,**

१. शहरात ज्या इमारती सन १९९४ ते सन १९९८ या कालावधीत बांधण्यात आलेल्या आहेत प्रामुख्याने त्या इमारतींमधीलच स्लॅब कोसळून दुर्घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर कालावधीत ज्या इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले आहे. त्या इमारतींमधील रहिवाश्यांनी तातडीने इमारतींची तपासणी संरचनात्मक अभियंता (Structural Engineer) मार्फत करुन घ्यावी.

२. इमारतीच्या आर. सी. सी. फ्रेम, कॉलम, बीम, स्लॅब इत्यादीच्या रचनेत बदल होत असल्याचे आढळल्यास उदा.
   - इमारतीचे कॉलम झुकल्यासारखे दिसून आल्यास......
   - इमारतीचे बीम झुकल्यासारखे दिसून आल्यास......
   - इमारतीची स्लॅब झुकल्यासारखे दिसून आल्यास......
   - इमारतीच्या स्लॅबच्या सळया गंजून व प्लास्टर निखळून सळ्या बाहेर निघाल्याचे दिसून आल्यास....

३. इमारतीच्या तळमजल्याचा भाग खचल्यासारखा दिसून आल्यास.....

४. इमारतीच्या कॉलममधील भेगा वाढत असल्यास दिसून आल्यास.....

५. इमरतीच्या कॉलममधील कॉक्रीट पडत असल्याचे दिसून आल्यास......

६. इमारतीच्या कॉलमचा भाग फुगल्यासारखा दिसल्यास.....

७. इमारतीच्या आर. सी. सी. चेंबर्स (कॉलम, बीम) व विटांची भिंती यातील साधा/भेगा वाढत असल्यास......

८. स्लॅबचे किंवा बीमचे तळमजल्याचे कॉक्रीट पडत असल्यास.....

९. इमारतीच्या गिलाव्यामध्ये (प्लास्टर) मोठया प्रमाणात भेगा असल्यास......

१०. इमारतीच्या काही भागात विशिष्ट आवाज होत असल्यास......

११. इमारतीच्या स्लॅब, बीम, कॉलमच्या भेगामुळे लोखंडी सळ्यांचा आकार गंजल्यामुळे कमी झालेला असल्यास......

**अशा इमारतीमध्ये आपण वास्तव्य करीत असल्यास इमारत तात्काळ रिकामी करुन परिच्छेद क्र. १ व २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**४. अशा परिस्थितीत वास्तव्यास असणा-या रहिवाशांनी काय काळजी घ्यावी.**

१. उल्हासनगर महानगरपालिकेच्या २४X७ कार्यरत असलेल्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाच्या ०२५१-२७२०१४३, २७२०१४९ अथवा टोल फ्री क्रमांक १८००२३३११०१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

२. सदर इमारत तातडीने रिकामी करावी.

३. आजूबाजूच्या इमारतीतील रहिवाशांनासुध्दा सतर्क राहण्यास अवगत करावे.

४. तातडीने तज्ञ आर. सी. सी. तांत्रिक सल्लागार यांना दाखवून प्रॉप्स/टेकू लावण्यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करावी.

५. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांची जिवीत व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्व जण जबाबदार नागरिक म्हणून आपआपल्या परिसरातील इमारतीवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना आपणास टाळता येतील.

*दिनांक २१ मे, २०२१*

29/5/2021

**(डॉ. राजा दयानिधी)** भा.प्र.से.
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका